मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

Email ID : lnjd-desk७@maharashtra.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संकीर्ण- २०२६/प्र.क्र.२५/का. ७ दिनांक : १० एप्रिल, २०२६.

## निविदा सूचना

**विषय:-** विधि व न्याय विभाग (खुद्द), करिता संगणकाकरिता सुटे भाग (की बोर्ड, माऊस, पेनड्राईव्ह, सी. डी., Hard disk, स्पाईक गार्ड, पेन्सिल सेल, रॅम व सीमॉस सेल इ.) वार्षिक दरकराराद्वारे खरेदी करण्यासाठी दरपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत.

विधि व न्याय विभाग (खुद्द) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई या विभागाकरिता संगणकांचे सुटे भाग (की बोर्ड, माऊस, पेनड्राईव्ह, सी. डी., Hard disk, स्पाईक गार्ड, पेन्सिल सेल, रॅम व सीमॉस सेल इ.) खरेदी करण्याकरीता एक वर्षाचा (सन २०२६-२७) दरकरार करण्यास मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२. मोहोरबंद लिफाफ्यावर "संगणकांसाठी सुटे भाग खरेदी दरपत्रक -२०२६-२७" असे स्पष्टपणे लिहिणे आवश्यक आहे. दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन संगणकांकरिता सुटे भाग पुरविण्याबाबतचे दरपत्रक सोबत जोडलेल्या नमुन्यात कक्ष अधिकारी (कार्यासन-७), दालन क्रमांक ३५३, तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे **दिनांक २० एप्रिल, २०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रितीने पाठवावेत.** त्यानंतर आलेली दरपत्रक स्वीकारण्यात येणार नाहीत. दरपत्रक सादर करताना खालील सूचनांचे अवलोकन करावे. सदर दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**दरपत्रक सादर करताना खालील अटी-शर्तीचे अवलोकन करावे :-**

१. निविदा फॉर्मवर निविदाधारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.
२. एका पुरवठादारास एकच दरपत्रक सादर करता येईल.
३. मागणी केल्यानुसार वस्तूंचे दर GEM पोर्टलवरील दरापेक्षा जास्त दर नसावेत.
४. विभागास पुरवठा केलेली सामग्रीत दोष (Defective) असल्यास, सदर सामग्री परत घेवून नवीन चांगल्या दर्जाची दोषविरहीत सामुग्रीचा पुरवठा करणे आवश्यक राहिल.

५. ज्या पुरवठादाराचे दरपत्रक स्विकारण्यात आले आहे, त्या पुरवठादाराने दरपत्रकात नमूद केलेल्या OEM कंपनीची व दरानुसार वस्तुंचा पुरवठा करावा लागेल. तसेच दरपत्रकात नमूद केलेली वॉरंटी देणे आवश्यक राहील.

६. कंपनीची नोंदणी असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले परवाना/प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.

७. कंपनीचे/कंपनीच्या मालकाचे पॅन कार्ड/जीएसटी प्रमाणपत्र साक्षांकित करुन दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.

८. निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राहय असलेले मागील ३ वर्षाची आयकर विविरणपत्रे साक्षांकित करुन सोबत जोडणे आवश्यक राहील.

९. कोणतीही एक अथवा सर्व दरपत्रक नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

१०. देयकांतून नियमानुसार TDS (IT+GST) व इतर करांची रक्कम कपात करुन आपणांस या विभागाकडून देयके अदा करण्यात येतील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदायगीस विलंब झाल्यास, अदायगीच्या रक्कमेवर व्याज अनुज्ञेय असणार नाही.

११. कोणत्याही विभागातर्फे तसेच शासकीय, निमशासकीय, कंपनीने काळया यादीमध्ये नाव समाविष्ट नसल्याचे हमी रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत नोटरीद्वारे सादर करावे.

१२. आपली सेवा समाधानकारक नसल्यास, कोणतेही कारण न देता (कराराची मुदत वाढविणे, कमी करणे किंवा सेवाकरार रद्द करणे यापैकी सोईस्कर असलेला निर्णय आपणास बंधनकारक राहील) सदर सेवा करार रद्द करण्याचे अधिकार प्रधान सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार, विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांच्याकडे राहतील. त्याचप्रमाणे पुढील सेवाकरार होईपर्यंत विभागास आवश्यकता भासल्यास त्याच दरात आणि अटी व शर्तीच्या अधीन राहून सेवासुविधा पुरविणे आपणास बंधनकारक राहील.

१३. उपरोक्त अ.क्र.०१ ते १२ अटी मान्य असल्याचे रु.५०० च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत नोटरीद्वारे सादर करावे.

(शैलेश खाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवड नस्ती, का.७.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संकीर्ण- २०२६/प्र.क्र.२५/का. ७ दिनांक : १० एप्रिल, २०२६.

विधि व न्याय विभाग (खुद्द), करिता संगणक संलग्न सामग्री खरेदी करण्यासाठी दरपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत.

लिफाफा -१ :-तांत्रिक दरपत्रक (फॉर्म-अ)

| | | |
|---|---|---|
| १. | निविदाधारक/पुरवठादार संस्थेचे संपूर्ण नाव, कार्यालयाचा पत्ता, ईमेल, दुरध्वनी/मोबाईल क्रमांक कार्यालयाच्या लेटरहेडवर प्रमाणित प्रत. | |
| २. | कार्यालयाचा संपूर्ण पत्ता नमूद असलेला पुरावा सादर करावा.<br>उदा. महानगरपालिकाचे कर भरणा देयक/दुरध्वनी देयक किंवा विद्युत भरणा देयकांची छायाकिंत प्रत. | |
| ३. | पॅन कार्डची छायांकित प्रत साक्षांकित करुन सादर करावी. | |
| ४. | निविदा सादर करण्याच्या दिनांकाच्या स्थितीस, मागील तीन वर्षाचे आयकर भरणा करण्यात आलेल्या प्रतीची छायांकित प्रत साक्षांकित केलेली प्रती. | |
| ५. | वस्तू व सेवा कर ( GST ) प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत साक्षांकित केलेली सादर करावी. | |
| ६. | व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणा-या विविध नोंदण्या:-<br>उदा:- दुकाने व संस्था अधिनियम १९४८: प्रमाणपत्र देणारे कार्यालय/प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैद्यतेची मुदत त्याचप्रमाणे उद्योग आधार कार्यालय/ प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैद्यतेची मुदत इ. छायाकिंत प्रत साक्षांकित केलेली सोबत जोडण्यात यावी. | |
| ७. | आपल्या संस्थेने मागील ३ वर्षात शासकीय/निमशासकीय कार्यालयांना संगणक संलग्न सामग्रीचा पुरवठा केल्याचे अनुभव कागदपत्रे, तसेच समाधानकारक काम केल्याबाबतचे संबधित कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. | |
| ९. | सदर निविदा सादर करतांनाच्या स्थितीस, कोणत्याही शासकीय/निमशासकीय विभागातर्फे काळया यादीमध्ये समावेश नसल्याबाबत रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर अधिकृत नोटरी (Notarized Affidavit) केलेले हमीपत्र. | |
| १०. | सदर निविदा सूचनेमधील नमूद करण्यात आलेल्या १ ते १२ सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.५००/-च्या स्टॅम्प पेपरवर अधिकृत नोटरी (Notarized Affidavit) केलेले हमीपत्र. | |

ठिकाण:-

दिनांक:-

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संकीर्ण- २०२६/प्र.क्र.२५/का. ७ दिनांक :१० एप्रिल, २०२६.

विधि व न्याय विभाग (खुद्द), करिता संगणक संलग्न सामग्री खरेदी करण्यासाठी दरपत्रक उपलब्ध करुन देण्याबाबत.

लिफाफा -२ :-अतांत्रिक वित्तीय दरपत्रक (फॉर्म-ब)

१. निविदाधारकांचे नाव व पूर्ण पत्ता:-
२. पत्रव्यवहाराचा पत्ता:-
३. दुरध्वनी क्रमांक अ) कार्यालय:-
ब)मोबाईल:-
४. ईमेल पत्ता:-

सुचना:- दरामध्ये तसेच निविदा कागदपत्र कोठेही खाडाखोड, ओव्हररायटिंग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

संगणक संलग्न सामग्री तपशिल

| अ.क्र. | वस्तुचे नाव | तांत्रिक विनिर्देश | नामांकित कंपनीची नावे | Warranty | किंमत | जीएसटी | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Pendrive | ०८/१६/३२ GB | sandisk | ०१ | | | |
| २ | Mouse Wired | Optical, USB A or C, (no PS/२ Port), २ buttons with Scroller, BIS certifications. | HP/Dell | ०३ | | | |
| | Mouse Wire-less | Optical, USB A or C (no PS/२ Port), २ buttons with Scroller, BIS certifications, Cell Type AA/AAA. | HP/Dell | ०३ | | | |
| ३ | Keyboard Wired | USB A or C (no PS/२ Port), १०४ Keys, BIS certifications. | HP/Dell | ०३ | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | Keyboard Wire-less | Bluetooth (and/or Wire-less Recevier), १०४ keys, BIS certifications, Cell Type AA/AAA. | HP/Dell | ०३ | | | |
| ४ | स्पाईक गार्ड | Sockets ४,Fuse/Overload protection, wire length २m/५m, Individual switch | Bajaj/ Everyday/Havells | ०१ | | | |
| ५ | पेन्सिल सेल (किबोर्ड/माऊस करिता) | Cell Type AA/AAA. | Everyday /Panasonic | ०१ | | | |
| ६ | Micro Lithium Cell (सिमॉस सेल- संगणकाकरिता) | ३.७ V | --- | ०१ | | | |
| ७ | घडयाळ सेल | -- | Everyday /Panasonic | ०१ | | | |
| ८ | RAM | १६ GB, DDR४, Speed ३२०० MHz, Form factor Desktop DIMM, Laptop- So-DIMM | Toshiba/ Samsung /Kingston | ०१ | | | |
| ९ | हार्ड डिस्क | २५६/५१२ TB, ५४०० RPM | Toshiba/ Samsung /Kingston | ०१ | | | |

ठिकाण:-

दिनांक:-

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का